पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ४९**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **सोमवार दि. १२/२/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. २०९०**

पुणे महानगरपालिका उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ च्या माहे जानेवारी २०१८ च्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप-१/३२४७ दि.५/२/२०१८ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २०९१**

मा.राजेश बराटे यांचे दि. २/२/२०१८ चे पत्र.

वारजे कर्वेनगर कार्यालय इमारतीमध्ये वातानुकुलन यंत्रणा पुरविणे, बसविणे व तदनुषंगिक कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०४, अ.क्र. ३५, शहरामध्ये भूमीगत केबल टाकणे, (यादी क्र. एसबी७), पान क्र.२११, अ.क्र.९१, प्रभाग क्र. ३१ ड कर्वेनगर मावळेआळी, कर्वेनगर कॅनॉल येथे अंडरग्राऊंड केबल टाकणे | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>वारजे कर्वेनगर कार्यालय इमारतीमध्ये वातानुकुलन यंत्रणा पुरविणे, बसविणे व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. २०९२**

मा.अमोल बालवडकर, मा.विजय शेवाळे व मा.प्रकाश ढोरे यांचे दि. २/२/२०१८ चे पत्र.

औंध-बाणेर-बालेवाडी क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्मार्ट सिटीची सद्यस्थितीतील हद्द औंध-बाणेर-बालेवाडी कार्यालयांतर्गत येणा-या प्रभागांचे हद्दीइतकी (प्रभाग क्र. ८ मध्ये संपूर्ण खडकी स्टेशन रस्ता व भाऊ पाटील रस्ता आणि प्रभाग क्र. ९ मध्ये हायवेच्या आतील संपूर्ण बालेवाडी व बाणेर) वाढविल्यास या सर्व भागांचा विकास झपाट्याने होऊ शकतो.

यास्तव, स्मार्ट सिटीची सद्यस्थितीतील हद्द औंध-बाणेर-बालेवाडी कार्यालयांतर्गत येणा-या प्रभागांचे हद्दीइतकी (प्रभाग क्र. ८ मध्ये संपूर्ण खडकी स्टेशन रस्ता व भाऊ पाटील रस्ता आणि प्रभाग क्र. ९ मध्ये हायवेच्या आतील संपूर्ण बालेवाडी व बाणेर) वाढविण्यात यावी.

**विषय क्र. २०९३**

मा.अमोल बालवडकर, मा.विजय शेवाळे व मा.प्रकाश ढोरे यांचे दि. २/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ९ बाणेर-बालेवाडी परिसराची स्मार्ट सिटी पायलट प्रोजेक्ट अंतर्गत निवड झाली असून स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेल्या विकास कामांचा आढावा घेण्यासाठी अथवा बैठकीसाठी या भागात स्मार्ट सिटी कार्यालय या परिसरात उपलब्ध नसल्याने बाणेर स.नं. २९/१+२ धनकुडे वस्ती येथे बांधण्यात आलेली नवीन क्षेत्रीय कार्यालयाच्या इमारतीमधील काही भाग हा स्मार्ट सिटी ऑफिससाठी (सिटीझन इन्क्वायरी सेंटर) म्हणून उपलब्ध करून देण्यात यावा.

**विषय क्र. २०९४**

मा.संजय भोसले व मा.विशाल धनवडे यांचे दि. २/२/२०१८ चे पत्र.

कार्टुनिस्टस कम्बाईन या नावाची संस्था ५२ नारायण पेठ, पोलिस चौकी मागे, पुणे ३० याठिकाणी असून सदर संस्था ही अनेक वर्षापासून व्यंगचित्रविषयक व्याख्याने, सादरीकरण, प्रात्यक्षिके, कार्यशाळा, परिसंवाद, मुलांसाठी शिबीरे, विविध प्रकारच्या स्पर्धा अशा अनेक विषयांवर सामाजिक संदेश देणारी प्रदर्शने आयोजित करीत असतात. त्यामुळे कार्टुनिस्टस कम्बाईन या संस्थेस अशा विषयांवर प्रदर्शने आयोजित करण्याकरीता दररोज २ तासांसाठी व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे कलादालन चालविण्यास देण्यात यावे.

**विषय क्र. २०९५**

मा.सौ.लता धायरकर यांचे दि. ३/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२१ब शिंदेवस्ती येथे ड्रेनेज लाईन व कॉंक्रीटीकरण करणेसाठी र.रू. १० लाख रुपयांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, यादी क्र.एस.वाय.१,यंत्रसामुग्री घसारा निधीतून विकत घ्यावयाची सामुग्री, पान क्र.२६६, अ.क्र. २२, प्रभाग क्र.२१ ब मध्ये संपूर्ण प्रभागातील कचरा व्यवस्था करीता घंटागाडी पुरविणे. | १० लाख | --- |
| <u>नविन सुचविलेले काम</u><br>प्रभाग क्र.२१ब शिंदेवस्ती येथे ड्रेनेज लाईन व कॉंक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. २०९६**

मा.प्रकाश कदम यांचे दि. ३/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३८ ड मधील कात्रज सर्व्हे नं. २३ येथील डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम क्रिडा संकुलाचे उर्वरित काम पूर्ण करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, पान क्र. २३९, अ.क्र. ५२४, प्रभाग क्र. ३८ ड मध्ये स.नं. २१ येथील जागेमध्ये बालभवन व विरंगुळा केंद्र बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३८ ड मधील कात्रज सर्व्हे नं. २३ येथील डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम क्रिडा संकुलाचे उर्वरित काम पूर्ण करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. २०९७**

मा.अरविंद शिंदे व मा.अविनाश बागवे यांचे दि. ५/२/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिका सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम चालू आहे. पुणे महानगरपालिकेच्या वतीने हददीच्या बाहेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमास अधिन राहून पूर्वी विकासकामे करण्यात आली आहेत. पुणे जिल्हयातील अनेक गड किल्ल्यांवर सार्वजनिक शौचालय नसल्याने दुर्गंधी पसरून आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. परिणामी सार्वजनिक शौचालय नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.

उदा.सिंहगड, सिंहगडावर हजारोंच्या संख्येने पर्यटक येत असतात. सिंहगड ही ऐतिहासिक वास्तू असून याठिकाणी सार्वजनिक शौचालय नसल्याने त्याचे **पावित्र्य नष्ट होऊन व** दुर्गंधी पसरून आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. सिंहगडावर सार्वजनिक शौचालय नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८९ अन्वये अंदाजपत्रकात योग्य तरतूद करून पुणे जिल्हयातील सर्व गड किल्ल्यांवर पुणे महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक शौचालय उभारण्यात यावे.

याप्रकरणी तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र. २०९८**

मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता यांचे दि. ६/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ४ अ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामधील पान नं.६२, अ.क्र. ५७९, प्रभाग क्र. २८ ब मध्ये न्यू इरा सोसायटी, धनुर्धारी, बुर्हानी, आशा पार्क सोसायटी येथील ड्रेनेज चेम्बर दुरूस्ती व साफसफाई करणे. | २० लक्ष | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ४ अ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | २० लक्ष |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्र. २०९९**

मा.योगेश समेळ यांचे दि. ६/२/२०१८ चे पत्र.

स्वर्गिय राजीव गांधी उद्यान, कात्रज. पुणे या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या तलावामध्ये यापुर्वी बोटिंग व मासेमारी हे दोन प्रमुख प्रकल्प सुरु करण्यात आले होते. परंतु काही वर्षांपुर्वी सदर तलावामध्ये मगर आढळल्याने सुरक्षेच्या दृष्टीने सदर तलावामधील बोटिंग व मासेमारी बंद करण्यात आली होती. परंतु सदर ठिकाणी बोटिंग व मासेमारी पुन्हा सुरु होणेकरिता तलावात असणारी मगर प्रशासनाने अथक प्रयत्न करुन पकडून मगरीचे स्थलांतर करण्यात आलेले आहे. व सदर तलाव हा बोटिंग व मासेमारीकरिता सुस्थितीत सुरु करण्याचा मार्ग मोकळा झाला होता.

परंतु तद्नंतर आजतागायत बोटिंग सुरु न झाल्याने व पुणेकरांना पुण्यामध्ये अन्यत्र कोठेही बोटिंगची व्यवस्था नसल्याने देखील पुणेकरांना बोटिंग पासून वंचित राहावे लागत आहे.

तरी स्वर्गिय राजीव गांधी उद्यानामध्ये लवकरात लवकर बोटिंगची व्यवस्था सुरु करण्यात यावी जेणेकरुन पुणेकरांना बोटिंगचा आनंद लुटता येईल व तसेच मासेमारी देखील सुरु होणेकरिता पुढील उपाययोजना त्वरीत करण्यात यावी.

**विषय क्र. २१००**

मा.सौ.दिशा माने यांचे दि. ६/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३५ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक<br>१)बजेट कोड : FE14A105/SG2-293, प्रभाग क्र. ३५ अ विनकर सभागृहासमोर सार्वजनिक शौचालय व मुतारी बांधणे | २० लाख | --- |
| २) बजेट कोड : CE12A422/552-143, प्रभाग क्र. ३५ अ विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या टाक्या पुरविणे व मनपा शाळेंमध्ये पिण्याच्या पाण्याची टाकी साफ करणे | १० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेली कामे</u>**<br>१.प्रभाग क्र. ३५ अ पंचवटी सोसायटी येथे रस्ता युटीडब्ल्यूटी पध्दतीने कॉक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |
| २.प्रभाग क्र. ३५ अ पंचवटी सोसायटी ते चव्हाण नगर मुख्य रस्ता लगत रस्ता युटीडब्ल्यूटी पध्दतीने कॉक्रीटीकरण व तद्नुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| ३.प्र.क्र.३५ अ चव्हाणनगर मुख्य रस्त्यालगत पंचवटी सोसायटी कडील रस्ता युटीडब्ल्यूटी पध्दतीने कॉक्रीटीकरण व तद्नुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २१०१**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत येणाऱ्या कामांच्या माहे जानेवारी २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ-१/९७३ दि.५/२/२०१८ चे पत्र.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. २१०२**

पुणे महानगरपालिकेच्या श्री.ढवळा कमा ढेंगळे, सहाय्यक मोटर मेकॅनिक (यांत्रिक) यांचे निलंबन कालावधीस दि. १२/५/२०१७ रोजी बारावी सहामाही व दि.१२/११/२०१७ रोजी तेरावी पूर्ण झाली असून सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र.५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/साप्र/९६४ दि.२/२/२०१८ चे पत्र.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. २१०३**

पुणे महानगरपालिकेच्या आर्किटेक्ट पॅनेलवर श्री.जयंत शामराव बारवकर यांचा समावेश करण्याबाबत मा.सौ.मंजुषा नागपुरे व मा.सुनिल कांबळे यांचे दि. १८/७/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३५६ दि. १८/७/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र. मआ/भवन/९८० दि. ६/२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

## सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. २१०४**

प्रभाग क्र. ३३ ड मध्ये फॉर्च्युन बिल्डींग ते स.नं.१५१ डी.पी.रोड तयार करणे (डांबरीकरण करणे) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.टी.जी.धमाणी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,४९,९९,१७१/- पेक्षा ५.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,४२,१६,२१४=२८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९६५ दि.२/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१०५**

बावधन स.क्र. २४,४९,५८ पी.व्ही.आय.पी.टी. येथील २४, १७ व १२ मी.डी.पी.रस्त्याचे विकसन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर अर्थमुव्हर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५,९२,३०,४८३/- पेक्षा ५.४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५,६०,३२,०३६=९१ पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९६६ दि.२/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१०६**

बिशप स्कुल ते त्रिंबकेश्वर सोसायटी येथे रस्ता विकसित करणे, बिशप शाळा आरनॉल्ड शाळा दरम्यान सेंट जोसेफ कॉलनी यांचे जागेतील रस्ता पुर्नडांबरीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणे, प्रभाग क्र. ५ ड मधील बिशप स्कुल ते विडंसर इस्टेट परिसरातील रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर अर्थमुव्हर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,५४२/- पेक्षा २८.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७०,९९,६८४=८१ उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेणेस, टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९६७ दि.२/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१०७**

प्रभाग क्र. १२ क डहाणुकर कॉलनी व तेजसनगर परिसरामध्ये नविन पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सदानंद जोशी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९९,५८५/- पेक्षा १६.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,१३,६५२=२३ पर्यंत अधिक सर्वसाधारण भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणाऱ्या कमी/अधिक रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/९६९ दि.२/२/२०१८ चे पत्र.

**(टिप :- प्रस्तुत काम समान पाणीपुरवठा योजनेमध्ये (२४X७) प्रस्तावित नसुन दैनंदिन पाणीपुरवठा सुरळीत करणेसाठी आहे.)**

**विषय क्र. २१०८**

प्रभाग क्र. १२ क प्रभागात विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सदानंद जोशी यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,८२९/- पेक्षा १७.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,१५,८५८=२४ पर्यंत अधिक सर्वसाधारण भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणाऱ्या कमी/अधिक रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/९७० दि.२/२/२०१८ चे पत्र.
**(टिप :- प्रस्तुत काम समान पाणीपुरवठा योजनेमध्ये (२४X७) प्रस्तावित नसुन दैनंदिन पाणीपुरवठा सुरळीत करणेसाठी आहे.)**

**विषय क्र. २१०९**

वडगांव बु.स.नं. १७, १८ ते स.नं. ३२ इंडियन हयुम पाईप पर्यंतचा ३० मी. डी.पी.रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनशाईन व्हेंचर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७९,९७,११३/- पेक्षा १९.६९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६४,२२,४८१=४५ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९७१ दि.२/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २११०**

चंदननगर पाण्याची टाकी ते जुना मुंढवा पुल येथे रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोतीलाल धुत इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,४२,८२,००४/- पेक्षा ३०.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९९,५०,२७२=१८ पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९७२ दि.२/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१११**

येरवडा क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मुख्य कॉंक्रीट रस्त्याचे जॉईंट भरणे, मिलींग करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.योगेश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६४,४३,१००/- पेक्षा ३२.७६६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४३,३१,९५३=८५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९७५ दि.५/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २११२**

प्रभाग क्र. १० अ सागर कॉलनी परिसरातील नाल्यास सिमाभिंत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर एंटरप्रायजेस् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,९०२/- पेक्षा १५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४२,४९,९१६=७० पर्यंत अधिक सर्वसाधारण व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची जादा रक्कम देणेस अगर कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/९७६ दि.५/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २११३**

प्रभाग क्र. १२ क वनाझ व अलकापुरी परिसरामध्ये नवीन पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार श्री.साई एंपायर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९९,२१७/- पेक्षा १६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,१९,३४२=२८ पर्यंत अधिक भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणाऱ्या कमी/अधिक रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापू/९७७ दि.५/२/२०१८ चे पत्र.
**(टिप :- प्रस्तुत काम समान पाणीपुरवठा योजनेमध्ये (२४X७) प्रस्तावित नसुन दैनंदिन पाणीपुरवठा सुरळीत करणेसाठी आहे.)**

**विषय क्र. २११४**

निरनिराळ्या ठिकाणी थर्मोप्लास्टीक पेंटचे पट्टे मारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराईझ कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६२,९२,१००/– पेक्षा ४०.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३७,७५,२६०/– पर्यंत काम करून घेणेस व त्याकरिता त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/९७८ दि.६/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २११५**

सोनावणे हॉस्पीटल जुनी इमारत पाडून नविन इमारत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दत्तात्रय कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २,८६,०२,५४१/– पेक्षा ०.१०५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. २,८५,७२,५०८=३३ अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/९७९ दि. ६/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २११६**

वारजे जलशुध्दीकरण केंद्र फेज १ व फेज २ तीन वर्षाकरीता चालविणे, दैनंदिन देखभाल दुरुस्ती व इतर तदनुषंगीक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.विश्वराज इन्व्हारमेंट प्रा.लि., ४ था मजला, मधु महादेव टॉवर, धरमपेठ, नागपुर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १३,२७,८६,९१४/– पेक्षा ५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १२,६१,४७,५६८/– (अधिक किमान वेतन कायद्यानुसार विशेष भत्ता, रजा वेतन, भविष्य निर्वाह निधी, बोनस इ.वेतनामध्ये होणाऱ्या बदलानुसार होणारा फरकानुसार) येणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यास व त्यानुसार त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यापोटी झालेल्या कामाचे बिल आदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/विद्युत(पापु)/९८१ दि. ६/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २११७**

खडकवासला रॉ वॉटर पंपींग फेज–१ व २, जुने वारजे जलकेंद्र व गणपती माथा पंपींग तसेच बुस्टर पंप ३ वर्षाकरीता चालविणे तसेच दैनंदिन देखभाल दुरुस्ती व इतर तदनुषंगीक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.श्री विनय इंजिनिअरींग सर्व्हिसेस प्रा.लि. १०१, मार्क व्हयू, गोविंद बच्याजी रोड, चरई, ठाणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८,३५,४३,७८३/– पेक्षा ७.८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७,७०,२७,३६८/– (अधिक किमान वेतन कायद्यानुसार विशेष भत्ता, रजा वेतन, भविष्य निर्वाह निधी, बोनस इ.वेतनामध्ये होणाऱ्या बदलानुसार होणारा फरकानुसार) येणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यास व त्यानुसार त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यापोटी झालेल्या कामाचे बिल आदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/विद्युत(पापु)/९८२ दि. ६/२/२०१८ चे पत्र.

## टेंडर्स न मागविता ५(२)(२) अन्वये

**विषय क्र. २११८**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागासाठी वृक्ष छाटनीसाठी अत्याधुनिक हायड्रॉलिक लॅडर मशिन खरेदी करणे (झाडे कापणे मशिन) करण्यासाठी अशा प्रकारच्या चासीजचे Government E-Market Portal (GeM) वरील दरपत्रक व स्क्रिन शॉट घेतले असता अशा प्रकारची चासीज मे.टाटा मोटर्स लि., मे. अशोक लेलॅण्ड लि. व मे.आयशर मोटर्स लि. या चासीज उत्पादक कंपन्याचे दर Government E-Market Portal (GeM) वर उपलब्ध असून मे.टाटा मोटर्स लि. या चासीज उत्पादक कंपनीचे दर सर्वात कमी असल्याने सदर चासीजची खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार प्रत्यक्ष उत्पादक कंपनी यांचेकडून सरकारी दराने (GeM) खरेदी करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/९६१ दि.२/२/२०१८ चे पत्र.

१. पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागासाठी वृक्ष छाटनीसाठी अत्याधुनिक हायड्रॉलिक लॅडर मशिन (झाडे कापणे मशिन) बांधणीकरीता चासीज महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे.टाटा मोटर्स लि., मुंबई या उत्पादक कंपनीकडून **TATA LPT 909 EX2-38 Cab Chassis PTOP BS-IV** या मॉडेलची १ नग चासीज रक्कम रु.१०,६३,१०३.२० पर्यंत जीएसटी व इतर सर्व खर्चासह त्यांचे दरापत्रकातील सर्व अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता खरेदी करणेस.

२. पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागासाठी वृक्ष छाटनीसाठी अत्याधुनिक हायड्रॉलिक लॅडर मशिन (झाडे कापणे मशिन) बांधणीकरीता चासीज महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार मे.टाटा मोटर्स लि., मुंबई या उत्पादक कंपनीकडून **TATA LPT 909 EX2-38 Cab Chassis PTOP BS-IV** या मॉडेलची १ नग चासीज रक्कम रु.१०,६३,१०३.२० पर्यंत जीएसटी व इतर सर्व खर्चासह त्यांचे दरापत्रकातील सर्व अटी व शर्ती स्विकारुन त्यांच्या बरोबर करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता खरेदी कामी होणारे देयक मे.टाटा मोटर्स लि., मुंबई यांचे अधिकृत विक्रेते यांचे नावे ऑनलाईन पध्दतीने ईसीएस/आरटीजीएस याद्वारे आदा करणेस.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २११९**

मा.सौ.सुजाता शेट्टी व मा.योगेश समेळ यांचे दि. २/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १६ क जुना कसबा पेठ ते जुना बाजार उड्डाणपूल रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) ची तरतुद आहे. सदर काम होत नसून सदरचे रक्कम खालीलप्रमाणे वर्गीकरण करुन रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) कमी व रुपये २,००,००,०००/- (अक्षरी दोन कोटी फक्त) अधिक प्रभाग क्र. १६(क)/(अ)/(ब)/(ड) मधील भागात विविध विकास कामे करणे

(टिप : सदर विषयाचा विचार एक महिन्यानी करावा असे दि.८/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २१२०**

मा.योगेश ससाणे व मा.मारुती (आबा) तुपे यांचे दि. ४/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २३ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, बजेट कोड क्र. एफई६१अे१११, १.हांडेवाडी (ससाणेनगर)येथे उडडाणपूल बांधणे. | १ कोटी | --- |
| <u>**नवीन सुचविलेली कामे**</u> | | |
| १) प्रभाग क्र.२३ अ मध्ये विविध ठिकाणी विद्युत केबल्स भूमिगत करणे | --- | ५० लाख |
| २) प्रभाग क्र.२३ अ मध्ये विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार एक महिन्यानी करावा असे दि.८/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २१२१**

मा.सौ.वैशाली बनकर व मा.योगेश ससाणे यांचे दि. ४/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २३ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, सार्वजनिक वाहतुक सुधारणा व विशेष प्रकल्प १/१ विभागामार्फत करावयाची कामे, बजेट कोड क्र. एफई६१अे१११, हांडेवाडी (ससाणेनगर)येथे उडडाणपूल बांधणे. | १ कोटी | --- |
| <u>**नवीन सुचविलेली कामे**</u> | | |
| १)प्रभाग क्र.२३ ब मध्ये कै.रामचंद्र बनकर शैक्षणिक व क्रिडा संकुलामध्ये विविध कामे करणे | --- | ५० लाख |
| २)प्रभाग क्र.२३ ब मध्ये कै.रामचंद्र बनकर क्रिडा संकुलामध्ये विद्युतची कामे करणे | --- | ३० लाख |
| ३) प्रभाग क्र.२३ ब मध्ये विविध ठिकाणी विद्युत तारांचे धोकादायक पोल हटविणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.२३ ब मध्ये जेट मशिनने ड्रेनेज लाईन साफ करणे | --- | १० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार एक महिन्यानी करावा असे दि.८/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २१२२**

सद्या पुणे शहरात स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी लाकडांचा वापर करण्यात येतो. त्यामुळे मोठया प्रमाणात वृक्ष तोडण्यात येतात जेणेकरुन पर्यावरणाचे मोठे नुकसान होते. ते होऊ नये म्हणून अंत्यविधीसाठी लाकडाचा वापर न करता व्हाईट कोल (ब्रिकेट) वापरण्याबाबत मा.सौ.सरस्वती शेंडगे व मा. सौ. स्मिता वस्ते यांचे दि. १५/६/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १९३ दि. २१/६/२०१७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आरोग्य/६६९, दि. २७/१२/२०१७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार एक महिन्यानी करावा असे दि.८/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. २१२३**

सन २०१७-१८ करिता पुणे महानगरपालिकेच्या जाहिराती वृत्तपत्रांना शासकीय दरानुसार व वृत्तपत्रांचे सवलतींच्या दरानुसार मा.महापालिका आयुक्त/मा.अति.महापालिका आयुक्त(वि/ज/ई) यांचे मान्यतेने जाहिरात वितरीत करणेबाबतच्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या वृत्तपत्र जाहिरात धोरणास व वर्तमानपत्रासाठीच्या अटी शर्तीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मावजसंका/९६२ दि.२/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१२४**

कर आकारणी व कर संकलन विभागातील विविध आकाराच्या महत्वाच्या जुन्या सर्व नविन कागदपत्रांचे/दस्तांचे स्कॅनिंग - डिझीटायझेशन करुन सुचीबध्द पध्दतीने संगणकिकरण करणे व शासकीय नियमांप्रमाणे कागदपत्रांची बांधणी करणे या कामास ५०% वाढीव काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/टीजीओ/९६३ दि.२/२/२०१८ चे पत्र.

१) मे.समर्थ सिस्टीम इंडिया प्रा.लि. यांच्याकडून निविदा क्र. ७/२०१६-१७ या मान्य निविदा र.रुपये २४,८०,०००/- रकमेच्या ५०% वाढीव र.रुपये १२,४०,०००/- पर्यंत म्हणजेच एकूण र.रुपये ३७,२०,०००/- पर्यंत काम करणेस, बिल अदा करणेस, वाढीव कामाचे कार्यादेश देणेस, करारनामा करणेस तसेच वाढीव र.रुपये १२,४०,०००/- ची ४% अनामत रनिंग/अंतिम बिलातुन कपात करणेस

२) बजेट कोड - सन २०१७-१८ व सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १.मुख्य देखरेख वसूली छ.कर आकारणी व कर संकलन कार्यालय, ३.संकिर्ण RE11G-103 मधून लॉकिंग व खर्ची करणेस

**विषय क्र. २१२५**

अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेअंतर्गत सभासदत्व घेतलेल्या वर्ग १ ते ४ संवर्गातील सर्व पदांवरील म.न.पा. सेवकांचे वेतनामधून मासिक सी.एच.एस.वर्गणी(मूळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता) या बेरजेच्या १% ऐवजी ४% नुसार कपात करणेस आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतनामधून मासिक सी.एच.एस. वर्गणी (मूळ निवृत्ती वेतन+महागाई भत्ता) या बेरजेच्या १% ऐवजी ४% नुसार कपात करणेस, व त्यानुसार कार्यवाही करणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/९७४ दि.५/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१२६**

स्वच्छ पुरस्कारासाठीची पुरस्कार विजेत्यांना पुरस्काराची रक्कम अदा करणेस व स्वच्छ पुरस्कार योजनेमध्ये भाग घेतलेल्या नामांकनामधून विजेते घोषित करण्यासाठी नामांकने तपासण्याकरीता गठीत केलेल्या समितीस मानधन अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/९८३ दि.६/२/२०१८ चे पत्र.

१. विजेत्यांसाठी ५० चेकची एकूण रक्कम रूपये ४,७९,०००/- (चार लाख एकोण ऐंशी हजार रूपये फक्त) अदा करणेस.

२. नेमलेल्या सदस्यांचे मानधन प्रत्येकी र.रू. १०,०००/- प्रमाणे ६ चेकची एकूण रक्कम रू. ६०,०००/- (साठ हजार रूपये फक्त) अदा करणेस.

३. सदरचा खर्च सन २०१७-१८ सॅनिटेशन कमिटी जनजागृती मोहिम RE19A103 या अर्थशिर्षकामधून धनादेशाद्वारे अदा करणेस.

| अ.क्र. | बक्षीस रक्कम | एकूण चेक संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| १. | ५०००/- | १० | ५०,०००/- |
| २. | ७०००/- | १७ | १,१९,०००/- |
| ३. | १००००/- | १३ | १,३०,०००/- |
| ४. | १५०००/- | ५ | ७५,०००/- |
| ५. | २१०००/- | ५ | १,०५,०००/- |
| | मानधन | एकूण संख्या | |
| ६. | १००००/- | ६ | ६०,०००/- |
| | एकूण रक्कम | ५६ | ५,३९,०००/- |

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**